

पॅथॉलॉजीतील

# प्रभावी पूर्वा

## डॉ. पूर्वा राणे - सुर्वे

लॅब डायरेक्टर, स्वानंद पॅथॉलॉजी लॅबोरेटरी

**आयुष्यात काहीही साध्य करण्यासाठी वाट पाहणं, आशा किंवा इच्छा करणं यापेक्षा योग्य कृती, तयारी आणि नियोजन यांची सांगड घालणं आवश्यक असत. चिकाटी, सातत्य, दूरदृष्टी आणि प्राप्त परिस्थिती स्वीकारुन स्वतःशी प्रामाणिक राहणे ही साधी तत्वे आंमलात आणली तर तुम्ही यशाच्या जवळ पोहोचता याची प्रचिती 'स्वानंद पॅथॉलॉजी लॅबोरेटरी' च्या संचालिका डॉ. पूर्वा राणे- सुर्वे यांना भेटल्यावर येते. आयुष्यात आलेल्या प्रसंगाशी धीरोत्तरपणे त्यांनी सामना केला. कठीण परिस्थितीत एकटीने, एकाग्र चित्ताने आणि धैर्याने परिस्थितीला तोंड देणे, स्वतःचे मनोबल ढळू न देणे, चांगले वाईट अनुभव घेत घेत त्यांनी आजवरची मजल गाठली आहे. दुःख मनाच्या तळाशी डांबून ठेवून आणि बाहेर मात्र आनंदाच झुंबर लखलखत ठेवावं अशी डॉ. पूर्वा यांची वृत्ती. कोरोना काळात सुरु केलेल्या स्वानंद पॅथॉलॉजी लॅबने अवघ्या तीन वर्षाच्या अवधीतच यशस्वी घौडदौड केली आहे. त्यांची यशकथा....**

डॉ. पूर्वा राणे - सुर्वे यांचा जन्म डोंबिवलीतील मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. डॉ. पूर्वा यांची आई प्रिया राणे गृहिणी तर बाबा श्री. रघुनाथ राणे हे ऑक्ट्रॉय मध्ये कार्यरत होते. घरात शिक्षणाला महत्त्व होते. डॉ.पूर्वा राणे यांचे शालेय शिक्षण डोंबिवली येथील डॉन बॉस्को स्कूलमधून झाले. अभ्यासात हुशार असणाऱ्या पूर्वा दहावीमध्ये शाळेमध्ये प्रथम आल्या. त्यानंतर मुलुंड येथील वझे केळकर कॉलेजमधून बारावी सायन्स व 2012 साली अहमदनगर येथील मेडिकल कॉलेजमधून त्यांनी एमबीबीएस पर्यंतचे शिक्षण पुर्ण केले. एमबीबीएस करताना डॉ. पूर्वा यांना पॅथॉलॉजी विषयाची विशिष्ट ओढ वाटू लागली. एमबीबीएस नंतर एम.डी पॅथॉलॉजी ही ब्रॅंच त्यांनी निवडली. 2014 मध्ये सायन येथील हॉस्पिटल, त्यानंतर टाटा हॉस्पिटलमध्ये 6 महिने पॅथॉलॉजीचे ट्रेनिंग त्यांनी घेतले. 2017 मध्ये एम.डी. पॅथॉलॉजीचे शिक्षण पूर्ण झाले. त्यानंतर बीएमसीच्या एम.टी.अग्रवाल हॉस्पिटलमध्ये काही काळ त्यांनी प्रॅक्टीस केली. शासकीय रुग्णालयामध्ये त्यांना शिकावयास खूप मिळाले. शासकीय रुग्णालयामधील अनुभवानंतर अंधेरी येथील सबर्बन लॅबमध्ये डॉ. पूर्वा यांनी कन्सल्टंट पॅथॉलॉजिस्ट म्हणून कामाचा अनुभव घेतला. मुलगा स्वानंदच्या जन्मानंतर त्याला सोडून रोजचा अंधेरी ते डोंबिवली प्रवास नकोसा वाटत होता म्हणून त्यांनी सबर्बन लॅबच्या ठाणे, उल्हासनगर येथील शाखेमध्ये काम करण्यास सुरुवात केली. उच्चशिक्षित, विद्याविभूषित पती डॉ. पंकज चौधरी (प्रख्यात युरोसर्जन) यांना कोरोनाच्या पहिल्या लाटेमध्ये कोविडने ग्रासले

णि त्यांची प्राणज्योत मालवली. आयुष्यात आलेल्या या वादळाने चून न जाता डॉ. पूर्वा यांनी सर्व शक्ती एकवटून पुन:श्च उभे ायचे ठरविले. दु:खाने त्यांना अधिक कणखर बनविले. भीतीने ांना अधिक शूर बनविले आणि आयुष्यात आलेल्या वैयक्तिक कटांने त्यांना समाजासाठी काम करण्यासाठी प्रवृत्त केले.

संपुर्ण जग कोरोनाच्या दहशतीतच होते. कोरोना महामारी ंकर होती. अशा परिस्थितीत रुग्णांची कोरोना विषाणूची तपासणी ळेवर झाली व अचूक रिपोर्ट त्यांना त्वरित मिळाले तर रुग्णांवर ढील औषधोपचारही तातडीने सुरु होतील, हा विचार मनात आला णि त्यातूनच स्वत:ची लॅब सुरु करावी असा मनोनिग्रह त्यांनी केला णि पतीच्या निधनानंतर अवघ्या तेराव्या दिवशी त्यांनी कामाला रुवात केली.

डॉ. पकंज यांचे स्वत:चे 3500 स्क्वे. फुटाचे हॉस्पिटल होते ाच जागी पॅथॉलॉजी लॅब सुरु करण्याचे ठरविले. डॉक्टरांच्या स्पिटल्स मधील काही मशिन्स होत्या त्यांची विक्री करुन, लॅबसाठी ागणाऱ्या सुसज्ज मशिन्स घेणे सुरु झाले. बँकेचे आधीचे कर्ज होते, ावाय नवीन कर्जासाठी त्यांनी बँकेकडे अर्ज केला. लॅब उभारणीचे ाम सोप्पे नव्हते. पैशांच्या जुळवाजुळवीसाठी त्यांनी शर्थीने प्रयत्न ले. अखेर बँकेकडून कर्ज मंजूर झाले आणि डॉ. पूर्वा यांच्या पंखात ळ आलं. पॅथॉलॉजी लॅब उभारणीचे काम अगदी युद्धपातळीवर सुरु ाले. वैयक्तिक दु:ख तर होतेच आणि मुलगा स्वानंद अगदी दीड र्षाचा होता, पण हाती घेतलेले तडीस न्यायचे त्यांनी ठरविले. त्यांच्या ा विचारांना आई- वडिलांनी पाठिंबा दिला आणि आत्तेभाऊ प्रविण ौधरी याने मदत केली. अवघ्या सहा महिन्यातच 11 डिसेंबर 2020 ला स्वानंद पॅथॉलॉजी लॅब रुग्णांसाठी सुरु झाली.

पूर्वा सांगतात, ''कोरोना काळातच लॅब सुरु झाली होती. कोविड तपासणीची परवानगी मिळाल्यामुळे एकीकडे गर्दीही वाढत होती तर दुसरीकडे स्टाफचे तसेच चाचणीसाठी भीतीदायक चेहऱ्यांचे मनोबल जपणे ही तारेवरची कसरत होती. टीमची दिवसरात्र







मेहनत चालू होती, रुग्णांना अचूक रिपोर्ट वेळेवर देण्यासाठी संपुर्ण टीम झटत होती. कोरोना काळात तर त्या स्वत: व त्यांची टीम सतत पिपीई किट घालूनच काम करायच्या. प्रोटेक्टीव्ह किट घातल्यानंतर श्वास घेणेही कठीण असायचे, त्यात उकडायचे. अक्षरक्ष: घामाने आंघोळच व्हायची. वैयक्तिक दु:खाला बाजूला ठेऊन टीमला सांभाळत अत्यंत भयावह परिस्थितीत एकमेकांना धीर देण्याचे काम चालू होते. तसेच पेशंटची विश्वासहर्ता जपत, वेळेत अचूक रिपोर्ट देण्याचे काम चालू होते. अनेक तणावग्रस्त, भीतिग्रस्त रूग्णांशी बोलून, हिमंत देऊन, समुपदेशन करण्याचे कामही मी केले.''

डॉ. पूर्वा सांगतात, ''समस्त देशवासीय आपल्या घरात कुटुंबासमवेत सुरक्षित असताना कर्तव्यभावनेतून कुंटुंबापासून, आप्त स्वकीयांपासून दूर जात अनेक डॉक्टर्सनी सेवाभाव जपला. स्वानंद पॅथॉलॉजीची संपूर्ण टीम कोरोना वॉरियर्स सारखीच दिवसरात्र रुग्णांसाठी झटत होती. आमचे एकच उद्दिष्ट होते ते म्हणजे लोकांची विश्वासहर्ता जपत त्यांना उत्तमोत्तम सेवा द्यावयाची.

लॅबमध्ये केलेल्या चाचण्या महत्त्वाच्या असतात कारण त्या डॉक्टरांना रोगाचा सारांश देतात आणि मानवी शरीरात विकसित होणारा आजार समजून घेण्यास मदत करतात. शिवाय, हे अहवाल डॉक्टरांना रूग्णाच्या स्थितीबद्दल योग्य निर्णय घेण्यास मदत करतात. या सर्व बाबींच गांभीर्य ओळखून स्वानंद पॅथॉलॉजिमध्ये तपासणीसाठी अचूकता आणि दर्जाला प्राधान्य दिलं जातं. विश्वासाहर्ता जपली जाते. या सगळ्यामुळेच सुरु होऊन केवळ वर्षभरातच नॅशनल अॅक्रेडीएशन बोर्ड फॉर टेस्टिंग अँड कॅलिब्रेशन या मान्यताप्राप्त संस्थेची मान्यता मिळवणारी 'स्वानंद' ही डोंबिवलीतली पहिली लॅब ठरली.''

स्वानंद पॅथॉलॉजी लॅब ही 3500 स्क्वे. फुटाची सुसज्ज लॅब आहे. जिथे पुर्णपणे ऑटोमेटेड मशीन्स आहेत. स्वानंद पॅथॉलॉजीमध्ये मूलभूत रक्त तपासणीपासून जवळपास सगळ्याच प्रकारच्या तपासण्या केल्या जातात. विशेष म्हणजे गर्भाशयाच्या कर्करोगासाठी केली जाणारी तपासणी सर्व्हायकल कॅन्सर (गर्भायशाचा मुखाचा कॅन्सरची चाचणी) पण इथे केली जाते. डॉक्टर स्वत: एक महिला असल्यामुळे येणाऱ्या महिला रूग्ण निसंकोचपणे त्यांच्याशी चर्चा करतात.

असते, पॅथॉलॉजिस्ट नसतात. कमी पैशांचं आमिष दाखवले जाते आणि त्यामुळे रुग्णांची दिशाभूल होते. वास्तविक पाहता पॅथॉलॉजी लॅब मध्ये एक कन्सल्टंट पॅथॉलाजिस्ट असणं खूप महत्त्वाचं असतं. त्यांच्याशिवाय डी.एम.एल.टी कोर्स झालेले लॅब टेक्नीशियन्स त्यांच्या कामाच्या अनुभवानुसार तसेच पदवीप्रमाणे सिनियर आणि जुनियर लॅब टेक्नीशियन्स तसेच लॅबमध्ये फ्लेबोटोमिस्ट म्हणजे रक्त तपासणीसाठी रक्त काढणारा टेक्नीशियन, होमव्हिजीट टेक्नीशियन्स (जे पेशंटच्या घरी जाऊन बल्ड आणि अन्य सॅम्पल कलेक्ट करतात) तसेच लॉजिस्टीक असतात. या सर्वांचा सारासार विचार करुनच स्वानंद पॅथॉलॉजी लॅबचा शुभारंभ आम्ही केला. स्वानंद पॅथॉलॉजी लॅबमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे डिपार्टमेंट असून सर्व प्रकारचे अनुभवी टेक्नीशियन्स आहेत आणि अचूक दर्जा व योग्य अहवाल ही आमची खासियत आहे.याशिवाय विवाह पूर्व आरोग्य तपासणीसारखे पॅकेजेस देखील त्यांच्या लॅब मध्ये उपलब्ध आहेत.

आपण या समाजाचे देणे लागतो या भावनेतून डॉ.पूर्वा कार्यरत आहेत. जिथे शक्य आहे तिथे विविध संस्थांमार्फत आरोग्यविषयी जागरूकता वाढावी या करिता त्यांचे अल्प दरात आरोग्य तपासणी शिबीरांचे आयोजन, वेगवेगळ्या ठिकाणी मासिक पाळी स्वच्छता तसेच थॅलेसेमिया सारख्या विषयांवर व्याख्यानाचे आयोजन, कार्यशाळांचे आयोजन, महिलांमध्ये वाढत्या स्तनांच्या कर्करोगावर मार्गदर्शन करण्यासाठी जागरुकता शिबीरांचे आयोजन त्या करतात.

डॉ. पूर्वा म्हणतात, '' स्वानंद पॅथॉलॉजी सुरु केल्यावर मी बाजारपेठ सर्वेक्षण केले. असंख्य पॅथॉलॉजी लॅब्स आहेत, पण मी कोणाशीच स्पर्धा केली नाही. मी नेहमी माझ्याशीच स्पर्धा केली. जिथे खाचखळगे निर्माण झाले, वाट बिकट झाली, तिथे मी आणि माझ्या टीमने मार्ग शोधून काढले. वैयक्तिक असो वा व्यावसायिक असो आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक संघर्षाशी सामना करीत असतांना चांगली-वाईट माणसे भेटत गेली. पण मी वाईट माणसांच्या वागण्याचा विचार

